E-Paper: www.vidharbhsatyajeet.in

RNI-MAHMAR-2023/88726

दैनिक विदर्भ सत्यजीत

LIVE NEWS

प्रमुख मार्गदर्शक
शौकत भाई शेख

मुख्य संपादक :- उध्दव श्रीराम फंगाळ
मो.9511446111/9921746611

कार्यकारी संपादक
योगेश सौभागे

बुलढाणा. वर्ष ३ रे , अंक २७९ वा , वार रविवार ७ जून२०२६ पाने ४ किंमत ४ रुपये

# मान्सूनपूर्व तयारीला सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्याचा जोर






सोयगाव सोयगाव: आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर सोयगाव तालुक्यात मान्सूनपूर्व शेती मशागतीच्या कामांना वेग आला आहे. गेल्या काही दिवसांपासून वातावरणात झालेल्या बदलामुळे आणि मान्सून लवकरच दाखल होण्याच्या अंदाजामुळे शेतकरी खरीप पिकांच्या तयारीत व्यस्त झाले आहेत.तालुक्यातील विविध गावांमध्ये शेतकरी ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरणी, वखरणी, ढेकळे फोडणे तसेच शेतजमिनी सपाट करण्याची कामे करत आहेत. अनेक ठिकाणी सोयाबीन, कापूस, मका, तूर आणि बाजरी आदी पिकांच्या लागवडीसाठी शेतजमीन तयार करण्यात येत आहे. काही शेतकऱ्यांनी बियाणे आणि खतांची खरेदीही सुरू केली असून कृषी सेवा केंद्रांवर गर्दी वाढली आहे. कृषी विभागाकडूनही शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे वापरण्याचे तसेच मृदा परीक्षणानुसार खत व्यवस्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसाच्या पहिल्या सरी पडताच पेरणीला सुरुवात करण्यासाठी बहुतांश शेतकऱ्यांनी मशागतीची कामे अंतिम टप्प्यात आणली आहेत.दरम्यान, शेतीसाठी आवश्यक अवजारे, ट्रॅक्टर व कृषी यंत्रांची मागणी वाढली असून ग्रामीण भागात कृषी कामांना गती प्राप्त झाली आहे. मान्सून वेळेत दाखल झाल्यास तालुक्यात खरीप हंगामाची सुरुवात समाधानकारक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मोहाडी येथे बोहाडा उत्सव सुरु






दिंडोरी दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथे देव देवतांना साकडे घालून सर्वत्र पाऊस चांगला पडावा व सुख समृद्धी लाभावी यासाठी शेकडो वर्षांची परंपरा असणारा बोहाडा उत्सव सुरु असून हा उत्सव पाच दिवस चालणार आहे.बोहाड्याची सांगता मंगळवार दि.९ जून रोजी सकाळी नृसिंहअवताराने होईल.या निमित्ताने मोहाडीचे ग्रामदैवत मोहाडमल्ल मंदिरासमोर तेल जाळणे व देवतांची सोंग नाचविणे असा मुख्य कार्यक्रम असतो.यानिमित्ताने गावातील सर्व जाती-धर्मांचे लोक एकत्र येतात व आपल्याला वंशपरंपरेने वाटून दिलेली मुखवटे नाचवतात. उत्सवाची सुरुवात गणपती आगमनाने होऊन शेवट नृसिंह अवताराने होतो. यानिमित्ताने सामाजिक समतेची व एकात्मतेची अनोखी भावना ग्रामस्थ पाळतात. माळी समाजाकडे भीम बकासुर, आसळी,ध्रुव,गजासूर,पाकोळी व गवळणी,सुतार समाजाकडे देवी व सारजा गणपती,ब्राह्मण समाजाकडे नारद व नृसिंह,धनगर समाजाकडे साती आसरा (अप्सरा),तेली समाजाकडे काट्या मारुती, आदिवासी समाजाकडे मासा, महिषासुर व यम तर सोनार समाजाकडे एकादशी,दलित समाजाकडे झुटिंग,नाभिक समाजाकडे वीरभद्र,तेली समाजाकडे रावण,शिंपी समाजाकडे इंद्रजीत, भैरव,खंडेराव,महादेव पार्वती,मराठा समाजाकडे थोरातंकडे नकटवडी व सोमवंशी कडे वेताळ अशी परंपरागत सोंगे दिलेली आहेत. ज्यांच्याकडे सोंगे नाहीत पण रामलीलेत भाग घ्यायचा आहे अशा हौशी तरुणांसाठी अंधश्रद्धा उद्बोधक ध्वजपर्वणी,भूताळ्या भगत,नाच्या हे सार्वजनिक ठेवलेली असतात. परंपरागत वाद्य पिपाणी संभळंवर नाचत सोंग मध्यभागी मंदिरासमोर आल्यावर लोहार, ब्राह्मण, ठाकूर संयुक्तपणे सोंगाची सबादणी करतात.म्हणजे सोंगाची किंवा त्या देवतेची ओळख व त्याने पुराणात केलेले कार्य सांगून लोकांचे उद्बोधन करतात. मधल्या वेळेत वाघ्या मुरळीचा गाण्यांचा तसेच कथांचा कार्यक्रम होतो. गावातील वाघ्या मुरळीचे जत्थे त्यात भाग घेतात.मोहाडमल्ल महाराज मंदिराला मांडव टाकण्याचा मान माळी समाजाकडे,दीपमाळेत तेल टाकण्याचा मान आदिवासी समाजाकडे तर नैवेद्य देण्याचा मान धनगर समाजाकडे आहे. बोहाड्यासाठी गावातील नोकरी धंद्या निमित्ताने बाहेरगावी गेलेली लोक सहपरिवार गावात येतात व सक्रिय सहभाग घेतात.



# जागतिक सायकल दिन व जागतिक पर्यावरण दिनानिमित्त तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धा संपन्न.

**सेलू डॉ अभिषेक खराडे** ता ६ मुक्तांगण आर्टच्या वतीने विद्यार्थ्यांनी नियमित सायकल वापरावी व पर्यावरणाचे संवर्धन करावे या हेतूने तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.स्पर्धेचे हे पाचवे वर्ष होते. सदरील स्पर्धा तीन गटात घेण्यात आली.श्री केशवराज बाबासाहेब विद्यालय येथील वसंतराव खारकर सभागृहात स्पर्धा संपन्न झाली.यावेळी परतुर येथील कलावंत परिमल पेडगावकर यांनी अक्षर गणेश प्रात्यक्षिक दिले.परिमल पेडगावकर यांनी श्री केशवराज बाबासाहेब विद्यालय नावातून गणपती साकारून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी व्यासपीठावर केंद्रप्रमुख एकनाथ जाधव, कवी डॉ.सुरेश हिवाळे, सामाजिक कार्यकर्ता सुनील गायकवाड, कवी माधव गव्हाणे आणि परिमल पेडगावकर आदी उपस्थित होते.दरम्यान सच्चिदानंद डाखोरे यांच्या वतीने उपस्थित कलार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धेचे परीक्षण परिमल पेडगावकर यांनी केले.सर्व स्पर्धकांना मान्यवरांनी शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. यशस्वीतेसाठी संचालिका भाग्यश्री कुंभार,चि.रुद्र खरात,आकांक्षा परभणीकर, कीर्ती राऊत,नामदेव क्षीरसागर,सुनील राठोड, सुनील तोडकर आदींनी परिश्रम घेतले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे. गट-अ १ ते ४प्रथम कु. आद्या कैलास खजिने-प्रिन्स इंग्लिश स्कूल , द्वितीय कु.आरुषी संदीप शेळके-ज्ञानतीर्थ विद्यालय , तृतीय कु.श्रावणी सुनील तोडकर-बाहेती बिहाणी नूतन इंग्लिश स्कूल उत्तेजनार्थ - चि. प्रणव दीपक-सोमानी ज्ञानलता पब्लिक स्कूल परतुर गट ब ५ ते ७प्रथम कु.संस्कृती सतीश कुमावत-आर.एस. दमानी स्कूल शहापूर, द्वितीय चि.केशवराज सदाशिव मुळी- विवेकानंद प्राथमिक विद्यालय , तृतीय कु.आदीश्री माधव आकाशे - उत्कर्ष विद्यालय उत्तेजनार्थ श्रेया हरिभाऊ रोडगे -जि.प.के. प्रा. शाळा रवळगाव गट क ८ ते १० प्रथम चि.प्रज्ञान प्रकाश भालेराव- सैनिक स्कूल चंद्रपूर , द्वितीय कु.प्रांजली कृष्णा जाधव - न्यू मॉडर्न इंग्लिश स्कूल तृतीय कु. सई श्रीकांतराव कुलकर्णी-नूतन कन्या प्रशाला उत्तेजनार्थ कु.सान्वी व्यंकट तोरनाळे नूतन विद्यालयसत्रसंचलन संचाल



# आरसा तुझ्याच मनाचा.....




बाह्यमन व अंतर्मन अशा मनाच्या दोन अवस्था असतात. या दोन्ही अवस्थांतून प्रत्येक माणूस जात असतो. बाह्यमनाने वरवर कितीही देखावा केला, तरी अंतर्मनाला सर्व काही माहिती असते. एखादी व्यक्ती जगाशी खोटं बोलू शकते, पण स्वतःच्या मनाला कधीच फसवू शकत नाही.आरशात पाहिलं की आपली बाह्य प्रतिमा दिसते, पण अंतर्मनाचा वेध घेणं तितकंसं सोपं नसतं. स्वतःशीच बोलण्याच्या अनेक पद्धती असतात. कधी व्यक्ती आपोआप बडबडते, तर कधी शांत दिसत असूनही अंतर्मनाशी संवाद साधत असते. कधी रागात पुटपुटते तर काही वेळा ती मनातल्या मनात दूरवर फिरून येते, तर काही व्यक्त न करता आलेल्या गोष्टी मनातच दडवून ठेवते.मनात साठवून ठेवलेल्या गोष्टींचा सर्वाधिक त्रास होतो. म्हणून भावना व्यक्त करून मन मोकळं करणं खूप गरजेचं असतं. जसं एखाद्या फुग्यात सतत हवा भरत गेल्यावर शेवटी तो फुटतो, तसंच मनात नकारात्मक विचार सतत साचत गेले की त्याचा अतिरेक होतो आणि त्याचे परिणामही खूप वाईट होतात. हळूहळू त्याचं रूपांतर मानसिक आजारात होतं, ज्याला आपण डिप्रेशन म्हणतो.डिप्रेशनचा आपल्या आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. मग माणूस स्वतःसाठी स्वतःच विणलेल्या जाळ्यात अडकतो. त्याचं स्वतःवरील भान हरवत जातं आणि मग त्याला एकांत प्रिय वाटू लागतो. हे सर्व टाळायचं असेल तर कायम सकारात्मक रहा.सततच्या तीव्र विचारांमुळे मेंदूमधील डोपामाइन हे रसायन कमी होत जातं. हेच रसायन आपल्या जीवनात आनंद निर्माण करत असतं.म्हणून माणसाने व्यक्त होणं खूप गरजेचं आहे. ज्याच्याशी बोलावंसं वाटतं, त्याच्याशी मनमोकळेपणाने बोला. ओठांवर स्मितहास्य ठेवून स्पष्टपणे व्यक्त व्हा; मनाला नक्कीच आनंद मिळेल.मोठमोठे महाल, पैसा आणि ऐश्वर्य यात माणूस गुंतत जातो. पण हळूहळू त्याला जाणवतं की, ''माझ्याकडे सर्व काही आहे, तरीही काहीतरी कमी आहे.'' ते ''काहीतरी'' म्हणजे मनाची शांतता.प्रत्येक व्यक्ती वेगळी असते. त्यामुळे दुसऱ्यांशी तुलना करण्यापेक्षा स्वतःमध्ये समाधानी राहा. ''आजचा दिवस मला जगायला मिळतो आहे,'' हेच सर्वांत मोठं समाधान आहे.मनाचा आरसा नेहमी स्वच्छ ठेवा. चुका झाल्या असतील, तर स्वतःची माफी मागा व स्वतःला माफ करा. तसेच दुसऱ्यांनाही माफ करा. जे काही तुमच्याकडे आहे, त्याबद्दल कृतज्ञ राहा. तुम्हाला जे मिळालं आहे, त्यासाठी आभार माना. आई-वडिलांमुळे हे सुंदर जग पाहायला मिळालं, त्यांच्याबद्दल कृतज्ञता बाळगा. तुमचं घर, तुमची मुलं, ज्यामुळे तुमचं घर नंदनवनासारखं फुलून गेलं आहे, तुमची माणसं, तुमच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण या सगळ्यांबद्दल आभार माना.कृतज्ञ राहणं ही मनाची मोठी ताकद असते. जेव्हा आपण प्रत्येक गोष्टीबद्दल कृतज्ञ असतो, तेव्हा आपला अहंकार आपोआप कमी होतो.हा लेख माझ्या लेखणीतून सुंदर कागदावर उतरला, त्याबद्दल मी माझ्या लेखणी व वहीकरिता मनापासून कृतज्ञ आहे.आपल्या मनाच्या आरशाची काळजीपूर्वक जपणूक करा. त्यावर धूळ जमा होऊ देऊ नका. कारण धूळ जमा झाली की प्रतिबिंब स्पष्ट दिसत नाही, आणि प्रतिबिंब स्पष्ट दिसलं नाही तर व्यक्तिमत्त्वही सुंदर घडत नाही. चांगल्या व्यक्तिमत्त्वासाठी मनाचा आरसा स्वच्छ असणं अत्यंत गरजेचं आहे.स्वच्छ मनाच्या चांगल्या व्यक्तिमत्त्वाकरिता व प्रत्येकांच्या मनात दडलेल्या गोड आठवणींसाठी हा लेख सादर समर्पित.लेखिका :

**सोनाली रायपुरे सहारे, ब्रम्हपुरी सोनशिल्प**



# सार्वजनिक बांधकाम कार्यालय, सेलू येथे ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा

**सेलू डॉ अभिषेक खराडे** ता ६रायगड कॉर्नर ते नायरा पंप परभणी रोड सेलू व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते वालूर नाका मदरसा सेलू या रस्त्यावर शाळा महाविद्यालय व नागरी वस्ती आहे. या रस्त्यावर शालेय विद्यार्थी, सामान्य लोक वयोवृद्ध लोक यांचे वागणे आहे. या भरधाव वाहनांमुळे त्यांना आपला जीव मूठीत धरून चालावे लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग सेलू ला वारंवार तोंडी व लेखी निवेदन देऊन तसेच कार्यालयात ठिय्या आंदोलन केले असता दिनांक ५-५-२०२६ रोजी येत्या आठ दिवसात गतिरोधक बसविण्याचे लेखी आश्वासन दिले आहे आज रोजी एक महिना झाला आहे तरीपण या रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात आले नाहीत याचा निषेध म्हणून. दिनांक १०-६-२०२६ रोजी कार्यालयात शालेय विद्यार्थी तसेच सामान्य नागरिक यांच्या वतीने बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे. जोपर्यंत आपण या रस्त्यावर गतिरोधक बसवत नाहीत. तोपर्यंत हे आंदोलन चालू राहील याची नोंद घ्यावी. अशे निवेदन श्री वेंकटेश्वर प्रतिष्ठानच्या व नागरिकांच्या वतीने देण्यात आले.यावेळी जयसिंग शेळके, डॉ. आलेश बुरेवार, संतोष निर्वळ, रवनितसिंग बब्बर, कृष्णा बहीवाल, अक्षय जोशी, ज्ञानेश्वर तमखाने, पवन नाईक, अशोक अंभूरे, मुंजा गाडेकर, शाहरुख पठाण, गौरव चव्हाण, पंकज परदेशी व नागरिक उपस्थित होते.



# अमरावती प्रजापिता ब्रम्हा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्य संचालिका राजयोगी बीके सिता दिदि यांचा अभिष्ट शुभ चिंतन सोहळा उमंग उत्साहात संपन्न




कारंजा लाड प्रतिनिधी :प्रजापिता ब्रम्हा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या अमरावतीचया मुखय संचालिका राजयोगी बीके सिता दिदि यांचा ६१वा जन्मदिवस उमंग उत्साहात रुखमिनी नगर केंद्रावर राजयोगी ब्रम्हा परिवाराचे उपस्थितीत संपन्न झाला .सकाळची मुरली झाल्यानंतर बाबाचे कम-यात बाबाला कुमकुम तीलक लाऊन राजयोगी सिता दिदि यांना ब्रम्हा कुमारीज बहीनोद्वारा शृंगारीत करण्यात आले याप्रसंगी केक कटींग होऊन दिप प्रज्वलीत करून एकमेकांना पुष्प गुच्छ देत उत्साही वातावरणात सिता दिदिना जन्म दिवसाचे शुभकामना देण्यात आल्या राजयोगी बी के प्रमोद भाई यांनी सिता दिदिच्या वाढदिवसा निमीत्त गीत गाऊन त्यांच्या गीताला नृत्याने व टाळ्या वाजवित उपस्थित ब्रम्हा परिवाराने साथ दिली . यावेळी बाबाचे प्यारे बच्चे बीके बहिनी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती . कार्यक्रमाचे







प्रास्ताविक बीके राजेश भाई यांनी केले . कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन ब्रम्हा कुमारी बहीनीने केले सर्वाचेआभार बाबा चे प्यारे हरीष भाई अडवाणी मानलेत उपस्थित ब्रम्हा मुख वंशावली परिवाराने रांगेत जाऊन सिता दिदिचे पुष्पगुच्छ भेटवस्तू देत स्वागत करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यात . उपस्थिताना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उपशामुळे कोट्यवधींचा महसूल बुडाल्याचा आरोप

## तहसीलदारांसह संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी; माजी सरपंच अनिस पटेल यांचे निवेदन




पैठण तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असून त्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जबाबदार कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी कोळी बोडखा येथील माजी सरपंच अनिस पटेल यांनी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार, गोदावरी नदीपात्रातील पाटेगाव व हिरडपुरी येथील वाळू घाटांना शासनाने मर्यादित प्रमाणात वाळू उपशाची परवानगी दिली होती. पाटेगाव घाटासाठी २ हजार ८६० ब्रास तर हिरडपुरी घाटासाठी सुमारे १२ हजार ५०० ब्रास वाळू उपशास मंजुरी देण्यात आली होती. मात्र, मंजूर क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात वाळूचे उत्खनन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.मार्च महिन्यापासून दिवस-रात्र सुरू असलेल्या या उत्खननासाठी पोकलेन व जेसीबीसारख्या यंत्रांचा वापर करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गोदावरी नदीपात्राचे स्वरूप बदलत असून पर्यावरणीय समतोल धोक्यात आल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.याशिवाय वडवळी, चनकवाडी, नायगाव, मायगाव, तुळजापूर, आपेगाव, नवगाव आणि कुरण पिंपरी परिसरातील नदीपात्रांतूनही मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दररोज शेकडो हायवा वाहनांद्वारे वाळूची वाहतूक होत असल्याने पैठण-छत्रपती संभाजीनगर व शहागड-छत्रपती संभाजीनगर मार्गांवर वाहतुकीचा ताण वाढून अपघातांची शक्यता निर्माण झाल्याचेही निवेदनात म्हटले आहे.पाटेगाव व हिरडपुरी येथील वाळू उपशाची एटीएस यंत्रणेद्वारे मोजणी करून शासनाचे नुकसान संबंधित ठेकेदारांकडून वसूल करावे, तसेच या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दहा दिवसांत कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही अनिस पटेल यांनी दिला आहे.दरम्यान, या आरोपांबाबत तहसीलदारांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वृत्त लिहिपर्यंत त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नव्हता.



## काजळेश्वर येथे शिव राज्याभिषेक सोहळा संपन्न .





कारंजा लाड :कारंजा तालुक्यातील ग्राम काजळेश्वर येथे दि ६जून रोजी ग्राम पंचायत भवन येथे शिव राज्याभिषेक सोहळा सरपंच नितीन पाटील उपाध्ये यांचे हस्ते हस्ते भगवा ध्वज फडकाऊन साजरा करण्यात आला .प्रथम ग्रामपंचायत भवन येथे छत्रपती शिवराय यांचे प्रतीमेचे पुजन व हारार्पन सरपंच व उपस्थित मान्यवरांचे हस्ते केल्या नंतर भगव्या ध्वजस्तंभाचे पुजन करण्यात आले त्यानंतर भगवा ध्वज फडकविण्यात आला . उपस्थित मान्यवरांनी ध्वजाला मानवंदना दिली . यावेळी ग्रा पं सदस्य गण तथा कर्मचारी वृंद यांची उपस्थिती होती . चहापाणा नंतर कार्यक्रमाची सांगता झाली



## वादळी वाऱ्यासह पावसाचा तडाखा; झाडे उन्मळून पडली, वीजतारा तुटल्या




पैठण / तालुक्यातील पाचोड,हर्षी, दावरवाडी व दादेगाव ,रहाटगाव ,आखतवाडा परिसरात शनिवारी दुपारी सुमारे चार वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून काही भागातील वीजपुरवठाही विस्कळीत झाला आहे.प्राथमिक माहितीनुसार, पैठण-पाचोड मार्गावरील विद्युत प्रवाह वाहून नेणाऱ्या काही तारा तुटून पडल्या आहेत. त्यामुळे परिसरातील वीजपुरवठ्यावर परिणाम झाल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच काही शेतकऱ्यांच्या शेतातील कृषी सौरऊर्जा (सोलार) पॅनेलचेही नुकसान झाले असून जोरदार वाऱ्यामुळे काही पॅनेल उखडून पडल्याची माहिती समोर आली आहे.दरम्यान, संबंधित विभागाकडून नुकसानीचा पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. मात्र, वादळी वाऱ्यामुळे शेतकरी व नागरिकांचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



## मान्सूनपूर्व पावसाच्या आगमनाने कैरीच्या लोणच्याची लगबग बाजारपेठा गजबजल्या







नाशिक पहिल्या मान्सूनपूर्व पावसाच्या आगमनाने वातावरणात गारवा निर्माण झाला असून ग्रामीण भागासह शहरांमध्ये वर्षभर पुरेल असे चटकदार कैरीचे लोणचे बनविण्याची लगबग सुरू झाली आहे.घरोघरी लोणच्याच्या तयारीला वेग आला असून बाजारपेठांमध्ये गावरान कैरी खरेदीसाठी महिलांची मोठी गर्दी होत आहे. लोणचे तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या घट्ट,ताज्या व आंबट गावरान कैऱ्यांना सध्या विशेष मागणी आहे.यंदा कैऱ्यांचे दर तुलनेने स्थिर असून बाजारात कैरी २५ ते ३० रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध होत आहे.मात्र वाढत्या महागाईचा परिणाम लोणच्यासाठी लागणाऱ्या मसाल्यांवर दिसून येत आहे.लाल तिखट,मोहरी डाळ,मेथी,हळद,हिंग तसेच खाद्यतेलाच्या दरात वाढ झाल्याने गृहिणींचे बजेट काहीसे वाढले आहे.बाजारपेठांमध्ये अनेक महिला कैरी जागेवरच फोडून घेण्यास प्राधान्य देत आहेत.यासाठी विक्रेत्यांकडून प्रतिकिलो अतिरिक्त शुल्क आकारले जात आहे.त्यामुळे घरातील मेहनत कमी होत असून लोणचे तयार करण्याचे काम अधिक सोयीस्कर होत असल्याचे महिलांनी सांगितले. लोणच्याचा खमंग स्वाद टिकून राहावा यासाठी गृहिणींकडून दर्जेदार मसाल्यांची जमवाजमव सुरू आहे. वर्षभर टिकणारे आणि पारंपरिक चवीचे अस्सल गावरान लोणचे तयार करण्यावर भर दिला जात असून अनेक शेतकरी कुटुंबियांच्या शेतात कैरी उपलब्ध असतात परंतू नोकरदारांना बाजारातूनच कैरी विकत घ्यावी लागते.पहिल्या पावसाच्या सरींसोबतच कैरीच्या लोणच्याचा दरवळ बाजारपेठांमध्ये पसरला असून आगामी काही दिवसांत कैरी व लोणच्याच्या साहित्याच्या विक्रीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील महिलांमध्ये पारंपरिक खाद्यसंस्कृती जपण्याची ही परंपरा आजही कायम असल्याचे चित्र सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे.

प्रतिक्रिया ''पहिला पाऊस पडला की घरात लोणच्याच्या तयारीला सुरुवात होते. यंदा कैऱ्यांचे दर परवडणारे आहेत, त्यामुळे वर्षभर पुरेल इतके लोणचे तयार करण्याचा आमचा मानस आहे. मसाल्यांचे दर वाढले असले तरी घरच्या घरी बनवलेल्या गावरान लोणच्याची चव आणि टिकाऊपणा वेगळाच असतो.''सौ.संगीता राऊत (गृहिणी)

## शिवराज्याभिषेक सोहळा जिल्हा परिषद ठाणे येथे उत्साहात साजरा







शहापूर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन लोकाभिमुख प्रशासन उभारूया मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त जिल्हा परिषद ठाणे येथे आज, दि. ०६ जून, २०२६ रोजी शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी प्रशासनाच्या कार्याचा गौरव करण्यात आला.६ जून १६७४ रोजी रायगड किल्लयावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. स्वराज्य, स्वाभिमान, लोककल्याण आणि सुशासनाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ राज्यभर शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येतो. त्याच अनुषंगाने जिल्हा परिषद ठाणे येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर मानाची स्वराज्य गुढी उभारून तिचे पूजन करण्यात आले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली.यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. शिक्षक रविंद्र तरे आणि सहशिक्षक यांनी पोवाडा गायन केले तसेच ''जय भवानी, जय शिवाजी'' आणि ''छत्रपती शिवाजी महाराज की जय'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमादरम्यान शिवचरित्रातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला.यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याण, न्याय, पारदर्शकता आणि सुशासन यांचे जे आदर्श निर्माण केले, ते आजही प्रशासनासाठी प्रेरणादायी आहेत. सर्वसामान्य जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी राज्यकारभाराची संकल्पना महाराजांनी प्रत्यक्षात उतरविली. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन उभारण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. शिवराज्याभिषेक दिन हा केवळ ऐतिहासिक स्मृतीदिन नसून सुशासन, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारा दिवस आहे.''यावेळी त्यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिवस्वराज्य दिनाच्या शुभेच्छा देत आपल्या कार्यातून समाजहित साध्य करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) पद्माकर लहाने, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन, समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे, कार्यक्रम अधिकारी शोभा शेलार, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांच्यासह सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल सूर्यवंशी यांनी केले. उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श जीवनात आणि प्रशासकीय कामकाजात अंगीकारण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

# म्हाळसापूर येथे लोखंडी औत विजेच्या तारेला चिटकल्याने ३५ वर्षीय शेतकऱ्याची निधन

## लोबंकळलेल्या जिवंत विजेच्या तारेचा बळी सेलू पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद

---सेलू अभिषेक खराडे ता ६तालुक्यातील म्हाळसापूर येथील ३५ वर्षीय तरुण शेतकरी आपल्या शेतातून लोखंडी औत घराकडे घेऊन येताना या अवताच्या दांडीचा स्पर्श रस्त्यात लोबकलेल्या विजेच्या जिवंत तारेला स्पर्श झाल्याने शॉट लागून निधन झाल्याची घटना शुक्रवारी ५ जून रोजी दुपारी १:३० च्या सुमारास घडली याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती याप्रमाणे तालुक्यातील म्हाळसापुर येथील ३५ वर्षीय तरुण शेतकरी आसाराम भीमराव आवटे हे म्हाळसापुर-पाथरी रस्त्यावर असलेल्या शेतातून लोखंडी औत घेऊन घराकडे येत होते. वाटेत त्यांच्या लोखंडी अवताची दांडी रस्त्यावर असलेल्या विजेच्या लंबकळलेल्या जिवंत तारेला चिटकली आणि आसाराम आवटे यास जोरात शॉट लागला ही घटना शुक्रवारी५ जून रोजी दुपारी १:३० च्या सुमारास घडली. घटनेची माहिती घरच्यांना कळताच रोहितावरून वीज पुरवठा खंडित करून तात्काळ उपजिल्हा रुग्णालय सेलू येथे आणण्यात आले परंतु डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले सायंकाळी सहा वाजता देऊळगाव गात आरोग्य केंद्राची वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय लोया यांनी शवविच्छेदन केल्यानंतर प्रेत नातेवाईक यांच्या स्वाधीन करण्यात आले त्यांच्या पार्थिवावर आज शुक्रवार रोजी सायंकाळी साडेसात वाजता माळसापुर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे मयताचे भाऊ पांडुरंग भीमराव आवटे. यांनी दिलेल्या खबरे वरून कलम ११५ अन्वये आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे मयत आसाराम आवटे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, चार मुली असा परिवार आहे. पोलीस निरीक्षक अरुण नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार गुलाब राठोड पुढील तपास करत आहेत.



# कौडासर येथे वीजवाहक तार तुटून पडल्याने महिलेचा मृत्यू

## एक महिला गंभीर जखमी; कारवाईच्या आश्वासनानंतर नातेवाईकांनी स्वीकारला मृतदेह




नाशिक तालुक्यातील कौडासर येथे अवकाळी पावसादरम्यान ११ केव्ही वीजवाहक तार तुटून शेतात पडल्याने झालेल्या दुर्घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला,तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे.या घटनेनंतर ग्रामस्थ व श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत दोषींवर कारवाईची मागणी केली.माया दिगंबर वाघेरे (वय ३५, रा.कोहोर,ता.पेठ) यांचा विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू झाला.तर चंद्रकला कृष्णा राऊत (वय ५०) रा.कौडासर या गंभीर जखमी झाल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार,कौडासर येथील कृष्णा पुंडलिक राऊत यांच्या शेतात काकडी वेल बांधणीचे काम सुरू होते.राऊत यांच्या मेहुणी माया वाघेरे या पाहुण्या म्हणून आल्या होत्या.त्या



शेतातील कामात मदत करत असताना सायंकाळी अचानक अवकाळी पावसास सुरुवात झाली. त्याचवेळी ननाशी-पिंपळगाव धूम मार्गावरील ११ केव्ही वीजवाहक तार तुटून शेतात पडली.तुटलेल्या वीजवाहिनीचा धक्का माया वाघेरे यांना बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.तर चंद्रकला राऊत याही विजेच्या संपर्कात आल्याने गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली असून त्यांच्यावर ननाशी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ, नातेवाईक तसेच श्रमजीवी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले. महावितरणच्या हलगर्जीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप करत दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात आली. कारवाई होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका ग्रामस्थांनी घेतल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता.परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी दिंडोरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भगवान मथुरे व पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर केदार यांनी पोलिस बंदोबस्तासह घटनास्थळी धाव घेतली.पोलिसांनी ग्रामस्थांशी चर्चा करून परिस्थिती शांत केली.अखेर महावितरणच्या पेठ विभागाचे सहाय्यक अभियंता कुमावत यांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह स्वीकारला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला.दरम्यान,या घटनेमुळे कौडासर परिसरात हळहळ व्यक्त होत असून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# केळापूर तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतींची आरक्षण सोडत १२ जूनला

## विशेष ग्रामसभांमधून सदस्य पदांचे आरक्षण निश्चित; नागरिकांना उपस्थितीचे आवाहन




पांढरकवडा :आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केळापूर तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतींसाठी सदस्य पदांचे आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया १२ जून रोजी विशेष ग्रामसभांमधून पार पडणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या कालबद्ध कार्यक्रमानुसार ही आरक्षण सोडत सकाळी १० वाजता संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये जाहीर पद्धतीने करण्यात येणार आहे.पांढरकवडा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या बिगर तसेच अंशतः अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये आयोजित विशेष ग्रामसभांमध्ये अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्गीय (ओबीसी) आणि संबंधित प्रवर्गांतील महिलांसाठी सदस्य पदांचे आरक्षण निश्चित करण्यात येईल. संपूर्ण प्रक्रिया प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.अंशतः अनुसूचित क्षेत्रातील बोरगाव, कारेगाव राम, पहापळ, चनाखा, ढोकी, कोंघारा, चालबर्डी आणि पिंपरीबोरी या ग्रामपंचायतींसह बिगर अनुसूचित क्षेत्रातील २३ ग्रामपंचायतींचा या आरक्षण सोडतीत समावेश आहे.




ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये आरक्षण निश्चितीला विशेष महत्त्व असल्याने इच्छुक उमेदवार, राजकीय कार्यकर्ते आणि ग्रामस्थांचे या प्रक्रियेकडे लक्ष लागले आहे.आरक्षणानुसारच विविध प्रवर्गांतील उमेदवारांना निवडणूक लढविण्याची संधी मिळणार असल्याने सोडतीनंतर अनेक ग्रामपंचायतींमधील निवडणुकीची समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांच्या दृष्टीने ही प्रक्रिया महत्त्वपूर्ण मानली जात आहे.दरम्यान, तहसीलदार राजेंद्र सुखदेवराव इंगळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सर्व ग्रामस्थ, मतदार आणि इच्छुक उमेदवारांनी विशेष ग्रामसभांना उपस्थित राहून आरक्षण निश्चितीची प्रक्रिया प्रत्यक्ष पाहावी व ग्रामसभेला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. १२ जून रोजी होणारी आरक्षण सोडत नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त दुर्मिळ पिवळा पळस वृक्षाची लागवड




नाशिक जागतिक पर्यावरण दिन १९७४ पासून संयुक्त राष्ट्रांनी सुरू केलेला हा दिवस आज १९० पेक्षा जास्त देश साजरा करतात.यावर्षी २०२६ ची थीम आहे " , " म्हणजे जमीन वाचली तर भविष्य वाचेल.अशाप्रकारे पर्यावरण दिनाचे औचित्य साधून इलेक्ट्रिक सबस्टेशन कोराटे येथे महाराष्ट्रात दुर्मिळ असलेला औषधी गुणांनी परिपूर्ण पिवळा पळस रोपाचे लागवड करण्यात आली. या लागवडीसाठी रोप ममदापूर अभयारण्यातून वनविभागाच्या मदतीने मिळवण्यात आले मिळालेली रोपे एक दिवस आधी वाहतूक करून वृक्षारोपण स्थळी आणण्यात आली. पर्यावरण दिन म्हणजे निसर्गाला समर्पित दिवस त्या दिवशी वृक्षारोपण करून वर्षभर लावलेल्या झाडांचे संगोपन करणे यासाठीच बनवलेला आहे.ही परंपरा जर आपल्या देशात सुरू झाली तर नक्कीच भारत हा सुजलाम आणि निसर्गाला समर्पित देश म्हणून गणला जाईल.याच उद्देशाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था दिंडोरी येथील पदाधिकारी व वनविभाग दिंडोरी यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण पार पाडले. याप्रसंगी वनविभागातील वनरक्षक योगेश दळवी,औद्योगिक प्रशिक्षण संस्था दिंडोरी येथील गटनिदेशक महेश बागुल सर,महेश चौधरी सर,जगदिश जाधव सर सोमनाथ कदम यांचा सन्मान करण्यात आला.तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था दिंडोरी एनसीसी अंतर्गत न्याहरी माता डोंगर येथे वृक्षारोपण करून भविष्यात वेळोवेळी वृक्ष संवर्धन करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. जागतिक पर्यावरण दिन उपक्रमात वैष्णवी चव्हाणके,सुयशा चव्हाणके,क्रांती चव्हाणके , भाऊसाहेब चव्हाणके,समाधान जाधव,नितीन ठाकरे,ऋषिकेश गडाख,सचिन कदम,राहुल कदम, सोमनाथ कदम,विक्रम आहेर, वनरक्षक योगेश दळवी,औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे महेश बागुल,महेश चौधरी,जगदीश जाधव या सर्वांनी सहभाग घेतला.

